# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक २७.०४.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २६.०४.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०८ केसेसमध्ये ०८ ईसमावर कारवाई करून एकुण ४,४०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच, जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये १० ईसमावर कारवाई करून एकुण ११,२००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,३८२ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,००,०००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) सोनेगाव पोलीसांची कामगिरी :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २७.०४.२०२६ चे ००.३० वा. चे सुमारास, सोनेगाव पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, उज्वल नगर, प्लॉट नं. ४०, ले—आऊट नं. ०३, हनुमान मंदीर जवळ, वर्धा रोड, सोनेगाव, नागपूर येथे एक इसम हातात शस्त्र घेवून फिरत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरून सोनेगाव पोलीस तेथे गेले असता, प्राप्त वर्णनाचा ईसम हातात शस्त्र घेवुन दिसुन आला, तो पोलीसांना पाहुन पळु लागल्याने, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी कोयता काढुन, त्यास निशस्त्र केले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सुरेंद्र वसंतराव मेंडुले, वय ५० वर्षे, रा. प्लॉट नं. सी/८, वर्धा रोड, सोमलवाडा, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी कोयता किंमती अंदाजे १५०/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने कोयता बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे सोनेगाव येथे आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी, पोलीस आयुक्त (परि.क्र.१) नागपूर शहर, मा. श्री. सतीषकुमार गुरव, सहा. पोलीस आयुक्त (अति.कार्य. सोनेगाव), वपोनि. नितीन मगर, पोलीस ठाणे सोनेगाव यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनि प्रमोद मोहिते, सफौ. दत्ता, पोहवा. विकास टोंग, पोअं. वैभव यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे कोराडी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक २६.०४.२०२६ चे २३.४० वा. चे सुमारास, फिर्यादीचे वडील नामे फिरोज उर्फ पिऱ्या शंकर पिटकर, वय ४५ वर्षे, रा. जवाहर नगर, वार्ड नं. १४, महादुला, कोराडी, नागपूर हे पोलीस ठाणे कोराडी हद्दीत, महादुला चौक, साई मेडीकल जवळून सर्विस रोडने पायदळ जात असता, ट्रक क्र. आर.जे. ११ जी.सी. ९३४५ चा चालक नामे धर्मेंद्र गंगाराम दानव वय २६ वर्षे रा. ग्राम कसोना ग्वाल्हेर (म.प्र.) याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन पायी जाणाऱ्या फिर्यादीचे वडीलास धडक देवुन, गंभीर जखमी केले. गंभीर जखमी यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी अर्जुन फिरोज पिटकर, वय २६ वर्षे, रा. जवाहर नगर, वार्ड नं. १४, महादुला, कोराडी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोराडी येथे मपोउपनि. क्रांती पवार ८६००९७५६६६ यांनी ट्रक चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१), २८१ भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून, ट्रक चालक आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे अजनी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २४.०४.२०२६ चे २०.१५ वा. ते दिनांक २६.०४.२०२६ चे ०२.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे अजनी हद्दीत, प्लॉट नं. ५१, गल्ली नं. १०, न्यु कैलास नगर, नागपुर येथे राहणारे फिर्यादी योगेंद्र सुरेश मानेकर, वय ३५ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह नातेवाईकाचे हळदीचे कार्यक्रमाकरीता नरसाळा येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी आलमारीतील सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने एकुण किंमती १,८०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अजनी येथे पोउपनि. अमित अंबेपवार ८६६८६४६३३४ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे सदर</u> :—** दिनांक २३.०४.२०२६ चे १०.५५ वा. ते ११.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सदर हद्दीत, एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे वॉर्ड नं. ३९ येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक २६.०४.२०२६ चे २०.३० वा. चे सुमारास, वॉर्डचे एच.ओ. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून, पोलीस ठाणे सदर येथे पोउपनि. निकेतन किल्लेदार ९२८४७३३७६४ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**

**( मनोज राऊत )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**